# १२. रंग मजेचे रंग उदयाचे

**अंजली कुलकर्णी** (१९५८) :


प्रसिद्‌ध कवयित्री, लेखिका. छात्रप्रबोधन, किशोर, वयम् यांसारख्या विविध नियतकालिकांतून गद्‌य व पद्‌य लेखन. 'मी-एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा', 'संबंद्ध', 'बदलत गेलेली सही', 'रात्र', 'दु:ख आणि कविता' हे कवितासंग्रह; 'हृदयस्पर्शी', 'संभ्रमाच्या पाण्यात गटांगळ्या' हे ललित लेखसंग्रह; 'स्त्री स्वत्वाचा शोध', 'स्त्री प्रश्न-एक आवर्त' हे वैचारिक लेखसंग्रह इत्यादी पुस्तके प्रकाशित. दोन काव्यसंग्रहांना राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त. महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, कामगार साहित्य परिषद, गदिमा प्रतिष्ठान यांसारख्या अनेक संस्थांच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जागतिकीकरणाच्या या काळात संगणकयुग अवतरलेले असले तरी माणसाचा मातीशी असलेला जिव्हाळ्याचा संबंध तुटता कामा नये. पर्यावरणाची जोपासना केली तर माणसाला कधीच काही कमी पडणार नाही. निसर्गसौंदर्याच्या विलोभनीय आविष्कारात जगण्याचा खराखुरा आनंदही मिळेल असा दृष्टिकोन कवयित्रीने या कवितेत मांडला आहे.

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी...

धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे



डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उदयाचे

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

**शब्दार्थ :**

**सृष्टी** - जग. **पुष्टी** - दुजोरा, पाठबळ. **वृष्टी** - पाऊस. **फेनधवलशा** - फेसाप्रमाणे पांढऱ्या. **अनोखी** - निराळी, वेगळी. **तुष्टी**- तृप्ती.

**(१) (अ) कवितेच्या आधारे बी रुजण्याच्या क्रियेचा ओघतक्ता तयार करा.**

डोंगरावर बिया उधळणे
↓
________
↓
________
↓
________

**(आ) आकृती पूर्ण करा.**

काळी आई जगवण्यासाठी अपेक्षित कार्य

**(२) चौकटी पूर्ण करा.**

(अ) जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण

(आ) कवयित्रीच्या मते जपायची गोष्ट

**(३) कवितेत आलेल्या खालील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) आभाळाचे छत्र .............

(आ) गर्भरेशमी सळसळ .............

**(४) कृती पूर्ण करा.**

(अ) 'कष्ट करणाऱ्यांना मदत करू' या आशयाची ओळ शोधा.

(आ) 'दौलत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(इ) कवितेतील 'यमक' अलंकार साधणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधा.

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगात सांगू गोष्टी'

(आ) पृथ्वीला वाचवण्यासाठी काय काय करावे असे कवयित्रीला वाटते.

(इ) वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी उपाय सुचवा.

❖ ❖ ❖

9ZEVTM